# खालापूरचा खूनी हल्ला
# व




# युवक क्रांती दलाची चळवळ

## युक्रांदची वाटचाल

युवक-विद्यार्थ्यांच्या वैशिष्टयपूर्ण व यशस्वी लढयाची मालिका युवक क्रांती दलाने महाराष्ट्रात निर्माण केली होती. शैक्षणिक भ्रष्टाचार, मराठवाडा विकास व दलित विद्यार्थी शिष्यवृत्ती वाढ, कृषिविद्यापीठातील भ्रष्टाचार ही महत्वाची आंदोलने होती. यातून काही मुलभूत प्रश्न युक्रांद समोर उभे ठाकले.

डिसेंबर १९७३ च्या कोथरुड शिबीरात युक्रांदने आपली मूलभूत भूमिका घोषित केली. तिची वैशिष्टये पुढील प्रमाणे :-

* जातिविहीन, वर्गविहीन, स्त्री-पुरुष समानतेवर आधारित, लोकशाहीवादी समाज निर्माण करण्याकरिता सम्यक् समाजवादी क्रांती हा युक्रांदचा संकल्प आहे.

* जातिविहीन व वर्गविहीन समाज निर्माण करण्याच्या ध्येयाला बांधलेल्या दलित जाती या क्रांतिकार्याचे ऐतिहासिक नेतृत्व करून भारतीय जनतेला शोषणाधिष्टीत व्यवस्थेतून मुक्त करतील.

* समाजवादाच्या स्थापनेसाठी व संवर्धनासाठी शेतीसकट सर्व उत्पादन साधनाची सामाजिक मालकी आणि लोकशाही नागरी व संघटना स्वातंत्र्याची हमी आवश्यक आहे.

* सम्यक् समाजवादी क्रांती घडवून आणण्याकरिता श्रमजीवि दलित जातीच्या नेतृत्वाखाली भारतातील भूमिहीन शेतमजूर, गरिब शेतकरी, कामगार, कनिष्ठ मध्यमवर्ग, आदिवासी-दलित, भटके - विमुक्त, युवक-विद्यार्थी, व स्त्रीया इ. शक्तींची क्रांतीकारक लढाऊ एकजूट निर्माण करण्याचा युक्रांदचा संकल्प राहील.

* दंड सत्तेचे कार्य कष्टक-यांच्या व समाजाच्याच हिताच्या दृष्टीने चालावे याकरिता राज्यसंस्था दलित जातींच्या नेतृत्वाखाली कष्टक-यांना आपल्या हाती घ्यावी लागेल.

* लोकशाही व सम्यक् समाजवादी क्रांतीचा विचार स्विकारलेल्या डोळस, जागृत व संघटीत शक्तीवर युक्रांदचा पूर्ण विश्वास आहे. म्हणून युक्रांद स्वत: मात्र शासन संस्था राबविण्याचा प्रयत्न करणार नाही, तर शासन संस्थेवर लोकशक्तिचा अंकुश निरंतर ठेवण्याचे काम करील.

या मूलभूत तत्वांचा आधार घेऊन युक्रांदने आपले कार्य चालू ठेवले. राशिनच्या [जि. नगर] सामंतशाही विरुध्द लढा पुकारण्यात आला. त्यानंतर वैजापूर, खुल्ताबाद, कन्नड, औरंगाबाद, सिल्लोड [जि. औरंगाबाद] भोकरदन [जि. जालना], सुधागड-पाली, खालापूर, रोहा, [जि. रायगड], खेड [जि. पुणे], नागपूर आदी तालुक्यांमध्ये भूमिहीन शेतमजूर-गरिब शेतकरी, दलित-आदिवासी-भटके विमुक्त व स्त्रियांच्या संघटना उभारण्याच्या कामाला कार्यकर्ते लागले. वर्षानुवर्षापासून स्वत:ला गाडून घेऊन प्रसिध्दीच्या सर्व माध्यमापासून दूर राहून कमालीची चिकाटी व सहनशीलता दाखवत अनेक कार्यकर्ते राबत आहेत. डोळस व जागृत लोकशक्तीच्या जोरावर लढयाचे नवनवीन मार्ग विकसीत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. यातून भूमिहीन शेतमजूर -गरिब शेतकरी आदी कष्टकरी समुहातील स्त्री-पुरुष कार्यकर्त्यांची फळी ठिकठिकाणी उभी ठाकली आहे. युक्रांदने स्विकारलेल्या भूमिकेचा दृश्य परिणाम काही क्षेत्रात तरी निश्चित पणे जाणवू लागला आहे.

मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढा, मंडल आयोगाचा प्रश्न, लोकविज्ञान चळवळ आदी लढयात युक्रांद सक्रिय होती. भीषण दुष्काळाविरोधी रोजगार-चारा-पाणी प्रश्न, गावठाण व गायरान-जंगल-दळी जमीन, शोषित व स्त्रीयां वरील अत्याचार आदी प्रश्नांवर सातत्याने लढे दिले जात आहेत. औद्योगिकरणातून निर्माण झालेली प्रदूषणाची समस्या, पाण्याच्या उधळया व अशास्त्रीय वापरातून उभा ठाकलेला खा-या जमिनीचा प्रश्न, दुष्काळ व पाणी प्रश्न यावर अलिकडच्या काळात रोहा [जि. रायगड] व

[कृ. मा. प.]

औरंगबाद-जालना जिल्ह्यात पध्दतशिर पहाणी कार्यकर्ते करीत आहेत. "लोकसमिती", "संघर्ष समिती", "सर्वहारा महिला आघाडी" व संघटना, "पिंपरी-चिंचवड मोलकरीण संघटना", "हमाल-मापाडी युनियन-वैजापूर" आदी जन आघाडयांमध्ये मित्र संघटनांच्या बरोबरीने युक्रांद सक्रिय आहे. "कोळसा भट्टी कामगार संघटना"व "शोषित जन आंदोलन" मध्ये अनुक्रमे कोळसा कामगार व जमीन प्रश्नांवर महाराष्ट्रातील अनेक मित्र संघटनांच्या बरोबरीने युक्रांद संघर्ष देत आहे. विषमता निर्मूलन समितीत प्रथमपासूनच सक्रिय आहे. १९८६ मध्ये"हिंद मजदूर किसान पंचायत" या भारतीय पातळीवरील कामगार संघटनेला आपल्या जन-वर्गिय संघटना संलग्न करण्यात आल्या.

सतत चालू असलेल्या संघर्षात कमालीच्या दडपशाही व असुरक्षिततेच्या वातावरणातून आज चळवळ वाटचाल करीत आहे. १९७५ च्या आणीबाणी नंतर लोकशाहीची पुर्नस्थापना झाली व राज्यघटनेने दिलेल्या स्वातंत्र्याचा उपभोग घ्यायला भारतीय जनता परत एकदा मोकळी झाली. परंतु प्रत्यक्षात ग्रामीण भारतात उच्च वर्ग-वर्ण-जातीय स्वरूपाची सघन शेतमालकांची आणीबाणी कायम राहिलेली आहे. १९७८ पासून मराठवाडयात १४४ व मुंबई पो. कायदा कलम ३७ [१] [२] [३] नेहमीच लागू असतात. परिणामी प्रत्येक छोटया मोठ्या कार्यक्रमाला पोलिसांकडून लेखी परवानगी घ्यावी लागत आहे. घोषणा व भाषणांचा मजकूर अगोदरच लेखी कळवावा लागतो आहे. गावोगाव फिरताना विविध खात्यातील पोलिसांचा ससेमिरा तापदायक बनत चालला आहे. कार्यकर्त्यांवरील खोटया खटल्यांचे प्रमाणही वाढत आहे. गायरान-जंगल-दळी जमीनी नावावर व्हाव्यात म्हणून सातत्याने लढणा-या कष्टक-यांवर सामाजिक-आर्थिक बहिष्कार टाकले जात आहेत. जातीयवादयाकडून हल्ले होत आहेत. महसूल व जंगल खाते उभ्या पिकांची नासाडी करीत आहेत. तरीही दुर्दम्य आशावाद व आत्मविश्वासाच्या जोरावर कार्यकर्ते व लढाऊ जनता चिकाटीने लढतच आहे. आपल्या सारख्या विविध क्षेत्रातील हितचिंतकांकडून पाठीवर मिळणा-या थापेमुळे हे शक्य झाले हे विनम्रपणे नमूद करीत आहोत.

अशारितीने वाटचाल चालू असतानाच दि. १३ एप्रिल ८७ रोजी रात्रौ १०-४५ वाजता खालापूर येथे युक्रांद महाराष्ट्राचे सहकार्यवाह, संघर्ष समिती व हिंद मजदूर किसान पंचायतीचे राज्य कार्यकारिणी सदस्य मधुमोहिते, कार्यवाह व का.का. सदस्य हिंमकिंचे शीताराम पंदेरे, संघर्ष समितीचे कार्यकर्ते नत्थु पवार व नारायण पवार यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. आणि मुंबईसह सर्वत्र खळबळ माजली. विरोधी पक्ष-संघटना-महिला संघटना-कामगार, युवक संघटना-पत्रकार स्वत:हून या घटनेच्या निषेधार्थ पुढे आले. समाजाच्या विविध थरातून याविषयी चौकशी केली जावू लागली. म्हणून खालापूर हल्ल्याचा तपशील व रायगड जिल्ह्यातील संघर्ष समितीच्या चळवळीची माहिती आपल्या समोर मांडत आहोत. आज युक्रांद चळवळीसमोर अनेक आव्हाने -अडचणी उभ्या आहेत. ज्यांचे सहकार्य व मार्गदर्शन आजपर्यंत मिळत आले त्यांच्याशी तातडीने व सामुदायिकपणे या प्रश्नांवर चर्चा करावी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. म्हणून हे निवेदन आपल्या समोर ठेवत आहेत.

## रायगड जिल्ह्यातील संघर्ष समितीची चळवळ : पार्श्वभूमी

युक्रांदची ग्रामीण क्षेत्रातील चळवळ महाराष्ट्राच्या अंतर्भागात आकार घेत होती. इकडे मुंबईतील कार्यकर्त्यांनी रायगड जिल्ह्याचा अभ्यास करायला सुरूवात केली.

मुंबई लगत असलेल्या रायगड जिल्ह्यात प्रचंड वेगाने औद्योगिकरण होत आहे. पनवेल, खोपोली पर्यंत मुंबईने आपले हात-पाय पसरले आहेत. थळवायशेतच्या खत प्रकल्पाने अलीबागचा चेहरा मोहरा बदलून टाकला आहे. रोहयात रासायनिक उद्योग स्थिरावले आहेत. फ्लोअर मिल्स, पोलाद कारखाने, रासायनिक कारखाने, बॉम्बे डाईंग -रिलायन्स-ओके सारखे सा-या देशाला कृत्रिम धागा पुरवणारे कारखाने इत्यादिंनी खोपोली-खालापूर

मार्गे बारमाही वाहणा-या पाताळगंगेचे दोन्ही तीर गजबजून गेले आहेत. सुधागड-पाली परिसरात छोटे उद्योग उदयाला येत आहेत. कोकण रेल्वे, मुंबई-पुणे व मुंबई-गोवा महामार्गांचे जाळे या रायगड जिल्ह्यात विणले गेले आहे. या औद्योगिक स्थित्यंतरामुळे मानवी समूहात व संबंधात प्रचंड उलथापालथ घडून येत आहे. निसर्गाचा समतोल बिघडवला जात आहे. प्रत्यक्ष निरिक्षणाने या बदलाचा नेमका अर्थ समजून घेण्यासाठी व त्यातून काही मार्ग काढता येईल का या भूमिकेतून १९८३ पासून युक्रांदच्या कार्यकर्त्यांनी सुधागड-पाली तालुक्याच्या जांभूळपाडा परिसरात काम करण्यास सुरुवात केली. पाठोपाठ खालापूर व रोहा या तालुक्यांत संपर्क वाढला.

## सुधागड-पाली येथील प्रारंभ आणि संघर्ष समितीची स्थापना :

सुधागड-पाली तालुका अत्यंत मागासलेला आहे. एकूण ९ हजार खातेदारांपैकी ५ हजारावर खातेदार अडीच एकर मध्ये मोडतात तर साडेतीन हजार खातेदार अडीच ते पाच एकरवाले आहेत. जेमतेम ५ % शेती दुपिकी आहे. एकंदर ४६ हजार लोकसंख्ये पैकी आदीवासींची संख्या २५ टक्के आहे. जमीन नाही, नियमीत कामाची हमी नाही म्हणून जवळ जवळ ८०-९० % लोक रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात सुमारे ७-८ महिने कोळसा पाडायला जातात. त्यांच्या प्रश्नांवर गावोगाव बैठका घ्यायला सुरुवात झाली. पाणी-जमीन-रस्ते-बँक कर्ज आदी प्रश्नांवर अर्ज विनंत्या करण्यात आल्या.

१९ ऑगस्ट १९८४ रोजी जांभूळपाडयाला स्थानिक पातळीवर "संघर्ष समिती"ची स्थापना करण्यात आली. ८ मार्च ८५ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त स्त्रियांचा मेळावा घेण्यात आला. प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची मागणी त्यावेळी करण्यात आली. वर्षभराच्या चिकाटीने अखेर ते सुरु झाले. ३ जुलै ८५ रोजी मित्र संघटनांच्या मदतीने पाली परिसरात "कोळसा भट्टी कामगार संघटना" सुरु करण्यात आली. १९ ऑगस्ट ८५ रोजी पाली तहशील व बी.डी.ओ. कचेरीवर धरणे धरण्यात आले. गायरान-जंगल जमिनी नावावर करणे, गावठाण, दारिद्र्य रेषेखालील नोंदणीची फेरतपासणी, शेतक-यांना खते व औषधांवर सबसिडी आदी मागण्यांवर अखेर अधिका-यांना बोलणी करावी लागली. संघटीत शक्तीची प्रचिती आदिवासी-दलित शेतकरी-शेतमजूरांना येवू लागली. गणपती उत्सवाच्या काळात आदिवासींच्या सांस्कृतिक उत्सवाचा कार्यक्रम करण्यात आला.

## रोहा येथील प्रदूषण व पहाणी

या वाटचालीचे पडसाद जवळच्या रोहा व खालापूर तालुक्यांवर पडत होते. रोहयात १९७१ पासून एम्आयडीसी मार्फत औद्योगिकरणास प्रारंभ झाला. कारखान्या- जवळील गावातील शेतक-यांच्या जमिनी गेल्या. ते कुशल कामगार नसल्याचे सांगून कारखान्यात नोक-या नाकारण्यात आल्या. रासायनिक कारखान्यांनी दुषित पाणी फारशी प्रक्रिया न करता येथून वाहणा-या कुंडलिका नदीत सोडले. परिणामी काठावरील शेतजमीन खराब होवू लागली. मत्स्यव्यवसाय पूर्ण बंद पडला. जगण्याचे साधनच नष्ट झाले. महागाई मात्र वाढली. या पार्श्वभूमीवर युक्रांदने १९८६ मध्ये २०-२२ गावांची आर्थिक व सामाजिक पहाणी करण्यास सुरुवात केली. या पहाणीला वस्तुनिष्ठ व शास्त्रीय स्वरूप देण्यासाठी आय.आय.टी मधील काही विद्यार्थी व तज्ञांचे सहकार्य घेण्यात आले. दरम्यान लोकविज्ञान संघटनेच्या सहकार्याने प्रदूषण विषयक एक चित्रप्रदर्शन या परिसरात दाखविण्यात आले. या पहाणीच्या निष्कर्षावर आधारित निश्चित धोरण व कार्यक्रम विकसित करण्याचा प्रयत्न सध्या चालू आहे.

## उंबरे गावचा संप व खालापूरची चळवळ

सुधागडला लागून असलेल्या खालापूर परिसरातील उंबरे गावात १९८६ च्या

जुलै मध्ये शेतमजूरीत वाढ व्हावी म्हणून उत्स्फूर्त संपाचा उठाव झाला. संपकाळात इतरत्र मजूरी करून शेतक-यांकडून आगाऊ घेतलेले पैसे संपद-यांनी परत केले. या संपाच्या पार्श्वभूमीवर पुढच्या लढयाची दिशा नक्की करण्यासाठी सप्टेंबर ८६ मध्ये उंबरे गावात परिषद घेण्यात आली. याच काळात गागोदे [ता. पेण] येथे "कोळसा भट्टी कामगार संघटनेच्या" वतीने जिल्हाव्यापी परिषद आयोजित करण्यात आली होती. सुधागड-पाली खालापूर येथील आदिवासी संघर्ष समितीच्या निशाणा खाली या परिषदेत सामिल झाला. "महाराष्ट्र कष्टकरी आंदोलन समिती" च्यावतिने २८ नोव्हेंबर ८६ महात्माफुले पुण्यतिथीला सुधागड-पाली तहसीलवर मोठया संख्येने मोर्चा व सत्याग्रह करण्यात आला. शेकडो शेतमजूर शेतक-यांनी स्वत:ला अटक करून घेतली. जमिनी नावावर करणे, गावठाणा-वरून आदिवासींना हुसकावून न लावणे, स्थलांतरीत मजुरांची नोंद करणे, रोहयोची कामे काढणे इ. मागण्या मंजूर करून घेण्यात आल्या.

संघटीत शक्तीचा हा प्रत्यय आल्यानंतर खालापूर तालूक्यात चळवळीला तोंड फुटले. गावोगाव सभा होवू लागल्या.

खालापूर हे तालुक्याचे गाव मुंबईपासून ७६ कि. मी. अंतरावर तर पनवेल पासून २५ कि. मी. वर आहे. एकूण ९८ हजार लोकसंख्येपैकी ३२ हजार लोक खोपोली नगरपालिके-च्या हद्दीत रहातात. खालापूरला विभागून टाटाच्या वीज केंद्रातील पाणी घेऊन पाताळगंगा नदी बारमाही वहात आहे. मुंबई-पुणे महामार्गावर खालापूर आहे. १५ ते २० कि. मी. वरून मुंबई-गोवा महामार्ग तर कर्जत-खोपोली रेल्वे शेजारीच आहे. परिणामी पाताळगंगेच्या काठावर मोठया प्रमाणावर रासायनिक कारखाने निघाले आहेत. त्यामुळे नदीचे पाणी दूषित झाले आहे. पाण्याला घाणवास येत असून रंग बदलला आहे. काठा-वरील जमिनीचा कस कमी झाला आहे. काही ठिकाणची पीके तर प्रदूषित हवा, अ‍ॅसिड व घातक रसायनांमुळे करपून जात आहेत.

महामार्ग व नदीजवळच्या जमिनींचा एकरी भाव ७ ते १० हजार रूपयावरून आज ६० हजार ते सव्वालाख रूपयापर्यंत गेला आहे. याच परिसरात सिनेनट, राजकीय पुढारी, कारखानदार व बडे व्यापारी यांनी मोठमोठया बागा व बंगले उभारले आहेत. बहूतेक वाडया या खाजगी जमिनीवर वसलेल्या आहेत. गुंड व दहशतीच्या जोरावर आदिवासी दलितांच्या या वस्त्या उठवून लावल्या जात आहेत. त्यांच्या जमिनी विकत घेता येत नाहीत म्हणून काही ठिकाणी त्यांचे सर्व्हे नंबर्स बदलण्यात आले आहेत. संरक्षीत कुळ घोषित करूनही हप्ते न भरल्याने आदिवासी-दलितांच्या जमिनी मालक काढून घेऊन विकत आहेत. गुरचरण [गायरान], जंगल व दळी जमिनीची कागदपत्रे शासकीय यंत्रणेने जप्त करून आज त्यांना त्यावरून हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला जात आहे.

कारखानदारी उभारताना या भागातील दलित-आदिवासी व मराठवाडा-कर्नाटकातून आलेला लमाण [बंजारा], कैकाडी, वडार व बेलदार हा भटका-विमुक्त समाज जनावराप्रमाणे राबतो. परंतु कारखाना सुरू झाल्यावर त्याच्याकडे कसब नाही म्हणून नोकरी नाकारण्यात येत आहे. त्यामुळे स्थानिक कामगारांची संख्या कमी आहे. मात्र मराठा व इतर सवर्ण शेतकरी युवक मुंबई-पनवेलमध्ये नोक-या करीत आहेत. त्यांच्या जमिनी पडीक पडत आहेत. त्या दरसाली २०० ते ४०० रू. भाडेपट्टीने आदिवासी-दलित कसत आहेत. पाताळगंगेचे पाणी उचलून उन्हाळी भात शेती व भाजीपाला मोठया प्रमाणावर केला जातो. ही भाजी पुणे-मुंबईचे व्यापारी खरेदी करतात. बांधकाम व्यवसाय जोरात असल्याने वीट-भट्टी व खडीचा व्यवसाय मोठया प्रमाणावर चालू आहे. पूर्वी कोळसा व्यापारी व कारखानदारांनी या भागातील जंगल उध्वस्त केले आहे. परिणामी उरलेले डोंगर व माती धुवून नेली जात आहे. यातून निसर्गाचा समतोल बिघडत चालला आहे.

## सुधागड-पालीच्या तुलनेत खालापूर

तालूक्याची काही महत्त्वपूर्ण वैशिष्टये आहेत.

१] आदिवासी-दलित स्थिरावला आहे.

२] कारखानदारीच्या परिसरात शेतमजूरांचा तुटवडा असल्याने मजूरीचे दर वाढले आहेत.

३] औद्योगिक कामगार संघटनांमुळे संघटीत शक्तीची जाणीव येथील आदिवासी-दलितांना झालेली आहे.

४] खडी व्यापारी-बागायतदार-कंत्राटदार व कारखानदार यांनी गुंडांच्या व दलालांच्या टोळ्या पोसल्या आहेत. शासकीय यंत्रणा पूर्णत: आज त्यांच्या ताब्यात आहे.

या सर्व पार्श्वभूमिवर जाने. ८७ पासून सुमारे ८०-९० गावांशी संबंधीत अशा ८-९ गावात जाहिर सभा घेण्यात आल्या. आदिवासी-दलित-जातीमधील युवक व स्त्रिया मोठ्या संख्येने कार्यकर्ते म्हणून कामाला लागले आहेत. त्याच बरोबर मराठा व आगरी व इतर जाती-जमातीमधील तरूणही पुढे येत आहेत. तसतशी पोटाच्या प्रश्ना-बरोबरच पोलिस व गुंडांची प्रकरणे समजू लागली माणसं निर्भय होवू लागली भोगलेले दु:ख बोलू लागली.

## पोलिस व धनाजी शेठची बेछूट गुंडगिरी

खालापूर पोलिस ठाण्याने या परिसरात आदिवासी-दलितांमध्ये कमालीची दहशत निर्माण केली आहे. ट्रक लूटणे, भुरटया चो-या, दारू आदी आरोपावरून सतत संपूर्ण वाडी झोडपून काढली जाते. खोटया केसेस केल्या जातात. कधीही वस्तीवर धाड घालून सर्व वस्ती धुवून नेली जाते. नवीन कपडे, भांडी, कोंबडया बक-या उचलून नेल्या जातात या मारहाणीतून तरूणांबरोबरच लहान मुले, म्हातारी माणसे, गरोदर व बाळंतिण बाया सुटत नाहीत.

## टायर - शॉक पध्दत व अपंगत्व

खालापूर पोलिस ठाण्यात संशयित आरोपीला [कातकरी-ठाकूर-दलितच फक्त]. टायरमध्ये घालून नालाबंदी पध्दतीने अमानुष मारहाण केली जाते. रक्त न येता झालेली ही भिषण माइहाण व त्यात वीजेचे शॉकस् दिले जातात या भागातील बरीच तरूण मुले याची शिकार आहेत. त्यातून अपंगत्व आल्याची उदाहरणे सापडतात.

खालापूरची आदिवासी स्त्री गोदाबाई दाजी हिचा एकुलता मुलगा सुदाम या पध्दतीचा वापर झाल्याने वेडा झाला व मागील दोन महिन्यापासून तो बेपत्ता आहे.

गणेश लहान्या पवारला या पध्दतीने मारहाण झाली व त्यासोबत त्याची आई व बहिणीस मारहाण करण्यात आली.

## टेंभरी प्रकरण व धनाजी शेठ

धनाजी [शेठ] भोईर हा कुंडेवहाळ [ता. पनवेल] गावचा रहाणारा असून त्याची खडी सेंटर्स व दारूचे गुत्ते आहेत. मुंबई-पुणे महामार्गावर बागा आहेत. सरकारी कंत्राटदारीची कामे त्याला मिळत असतात. मालकीचे ट्रक्स व काही दुकाने आहेत. पनवेल तालूक्यातील काही खून प्रकरणात त्याने सुमारे ११ वर्षे शिक्षा भोगलेली आहे. बिना परवाना बंदुका व हत्यारांचा सर्रास वापर तो करत असतो. खडी सेंटर्स वर कर्नाटक मराठवाडयातील भटक्या-विमुक्त जमातीमधील व आदिवासी मजूर वेठबिगार म्हणून डांबून ठेवण्यात आलेले आहेत.

... ६ ..

ट्रकमध्ये गुंड भरायचे, शस्त्रे घेऊन वस्ती लुटायची तेथील बाया उपभोगायच्या व मोकळी झालेली जमिन कारखानदारांना विकायची हा त्याचा व इतर दलालांचा धंदा आहे. अशा अत्याचारित आदिवासी व दलित बायांची संख्या मोठी आहे.

टेंभरी गावच्या कातकरी वाडीत सुमारे ६० कुटूंब रहातात. गेल्या वर्षी मार्च-एप्रिल, १९८६ रोजी या धनाजी शेठने लागोपाठ तीन वेळा या गावावर ट्रकभर गुंड आणून हल्ला केला. बंदुकांच्या फैरी झाडण्यात आल्या. वाडीवरील स्त्री-पुरूषांसह लहान मुलांना झोडपून काढण्यात आले. एका स्त्रिला सर्वांसमक्ष जबरदस्तीने उचलून नेऊन चार दिवस स्वत:कडे ठेवली व नंतर तिच्यावर खोटी केस घालून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. असा तिच्यावरच केस चालू आहे.

या हल्ल्यात चार कुत्रे व दोन बक-यांना धनाजीने चाकू व गोळ्यांनी ठार केले. शेकडो कोंबडया, सर्व बकरे उचलून नेले. वाडीतील सर्व भांडी, खाटा घेऊन गेले. घरे मोडून टाकली. जिवाच्या भितीने आदिवासी डोंगरात पळून गेले.

या हल्ल्या व लुटालुटीनंतर पाठोपाठ खालापूरच्या पोलिसांनी टेंभरी गावाला परत गराडा घातला व उरली सुरली माणसे झोडपून काढली. वस्ती उध्वस्त केली, त्यामुळे तरूण आदिवासी आजपर्यंत वाडी सोडून जंगलात वणवण फिरताहेत.

धनाजी शेठ व त्याच्या गुंडांवर खटला भरण्याऐवजी या वाडीवर नाईलाज म्हणून राहिलेल्या राघो भिवा [वय ६०], गणू किसना [वय ६५], लक्ष्मी जान्या [वय ५०], नथी दामू [वय ३५] आदि ओल्या बाळंतिणी व म्हाता-या ६ बाया, आणि ५ पुरूषांना पोलिसांनी अटक केली. केस अजून चालूच आहे.

मात्र धनाजी विरुध्द खालापूर तालुक्यात एकही केस नोंदविलेली नाही. पैशाच्या जोरावर पोलिस व शासकीय यंत्रणेशी अत्यंत चांगले संबंध ठेवण्यात धनाजी यशस्वी झाला आहे। रायगड जिल्ह्यात समुद्र किना-यावर चालणा-या स्मगलिंग प्रकरणांची त्याला ब-यापैकी माहिती असल्याचे या भागात बोलले जाते. वेळोवेळी विविध राजकीय पक्षांचा आश्रय घेऊन आपली अमानुष कृत्ये दडपून टाकण्यात त्याला यश आलेले आहे. आदिवासी ठाकर व कातक-यांकडे सतत संशयाने पहाण्याची परंपरा या परिसरात पडलेली आहे. अंगावर नविन कपडे दिसले की ते चोरीचेच असावेत असे मानून ते जप्त केले जातात. जिल्ह्यात कुठेही चोरी-दरोडा पडला की, या परिसरातील आदिवासी वाडयांवर धाडी घालायच्या ही प्रथा सर्रास पडलेली आहे.

अमानुष व बेछूट गुंडगिरी करणा-या पोलिस व धनाजी शेठला आजपर्यंत कुणीच जाब विचारला नव्हता. सर्वांत प्रथम आवाज संघर्ष समितीने दिला.

## प्रत्यक्ष हल्ल्याची घटना

२ एप्रिल ८७ रोजी खालापूरला संघर्ष समितीची मोठी जाहिर सभा झाली. त्यानंतर तहसिलवर मोर्चा नेण्यात आला. त्यावेळी तहसिलदारांनी १३ एप्रिल रोजी सर्व विभाग प्रमुखांसमवेत बैठक घेण्याचे जाहिर केले. या सभा व मोर्चात हिंमकिपं.चे नेते साथी शरदराव, राज्य सरचिटणीस साथी शंकर साळवी, म्युनि. लेबर युनियनचे सरचिटणीस प्रभाकर आडेरकर, युक्रांदे महाराष्ट्र कार्यवाह शांताराम पंदिरे, अजित सरदार, निर्मला स्वामी, सहकार्यवाह व संघर्ष समितीचे प्रमुख कार्यकर्ते मधु मोहिते यांनी भाषणे केली होती.

१३ एप्रिल ८७ रोजी ठरल्याप्रमाणे दु. ३ वा. खालापूर तहसिलमध्ये बैठक सुरू झाली. सायं. ५-३० वा. बैठक संपली. या बैठकीत संघर्ष समितीने तहसिलदार नाईक व सिनि. फौजदार शेख यांना दोन स्वतंत्र निवेदने सादर केली. या बैठकीला तालुक्याचे सभापती, भूजल सर्वेक्षण यंत्रणा, जंगल खाते, कृषि, रोहयो आदि विभागांचे अधिकारी

तसेच पनवेलचे सर्कल इन्स्पेक्टर मोहन कांबळे, सिनि. फौजदार, तहसिलदार, हिंमकिर्पचे शंकर साळवी, मधु मोहिते, प्रभाकर आडेरकर, शांताराम पंदिरे, नत्थु पवार आदि प्रमुख हजर होते. तहसिल बाहेर हजारो आदिवासी-दलित शेतकरी शेतमजूर जमा झाले होते. या बैठकीत जवळजवळ सर्वच मागण्यांवर ठोस निर्णय घेण्यात आले. पैकी दोन महत्त्वाचे निर्णय पुढीलप्रमाणे :-

१] गावठाण जमिन सर्व आदिवासी-दलितांचे नांवे ७/१२ च्या इतर हक्कात घालण्याचा कार्यक्रम ३१ ऑगस्टपर्यंत पूर्ण करणे. तोपर्यंत या जमिनींच्या कोणत्याही व्यवहारांच्यावेळी संघर्ष समिती व संबंधित आदिवासी-दलितांना विश्वासात घेतले जाईल.

२] धनाजी शेठने आदिवासी स्त्रियांवर चालविलेल्या अमानुष अत्याचारांची चौकशी येत्या १५ दिवसात पूर्ण करणार व त्याच्या बंदूका जप्त करून परवाना रद्द करण्यात येईल, असे स्पष्ट आश्वासन तहसिलदार, सिनि. फौजदार व सर्कल इन्स्पेक्टर यांनी दिले.

हे निर्णय बाहेर जमलेल्या समूहाला सांगून १५ दिवसात जर याविषयी पावले उचलली गेली नाहीत तर संघर्ष समिती स्वत:च्या ताकदीवर या गुंडगिरीला तोंड देईल असा इशाराही यावेळी देण्यात आला होता. ही सर्व बोलणी व सभा सावध झालेल्या धनाजी शेठ व त्याच्या माणसांनी ऐकली होती. मात्र त्याची कल्पना संघर्ष समिती व युक्रांदच्या कार्यकर्त्यांना नव्हती. धनाजी शेठ यामुळे चिडला होता.

सभेनंतर प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक खालापूर तळ्याजवळ रात्री १०-३० पर्यंत चालली. मग कार्यकर्ते आपापल्या घरी निघाले आणि मधु मोहिते, शांताराम पंदिरे व इतर सहकारी जेवायला घरी बसले. इतक्यात धनाजी शेठ जीपमधून आला. बंदूका रोखून, लोखंडी गज व चाकूने मधु व शांताराम यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. सोबत नत्थु पवार व नारायण पवार यांनाही मार लागला. बाकी कार्यकर्ते पोलिस ठाणे व वस्तीवर धावत गेले. दरम्यान त्यांच्यावर धनाजीने गोळीबार केला. त्यात मधुच्या उजव्या पायाच्या नळीला गोळी लागली. प्रचंड रक्तस्त्राव व सततच्या माराने मधु बेशुद्द पडला. या दोघांना प्रचंड मारहाण चालली असतानाच घरातील दिवे - बत्ती फोडून टाकण्यात आली. सुमारे १२ मिनिटानंतर जेव्हा लोक धावत आले तेव्हा त्यांच्यावर धनाजीच्या साथीदाराने गोळीबार केला व सर्वजण जीपमधून सुसाट वेगाने पळून गेले. त्यानंतर सुमारे १५ मिनिटांनी २ फर्लांग अंतरावरील पोलिस ठाण्यातील पोलिस जीपने आले. जखमी मधु, शांताराम, नत्थु आदिंना प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. तेथे डॉ. सय्यद यांनी औषधोपचार केले. मधुच्या डोके, पाठी व पायाला टाके घातले गेले. डॉक्टरांच्या सांगण्यावरून पोलिस ॲम्ब्युलन्समधून सायन हॉस्पिटलमध्ये मधुला पहाटे दाखल करण्यात आले. शांताराम व इतर जखमी इलाज झाल्यावर तेथेच राहिले. त्यानंतर शांतारामचा जबाब घेऊन पोलिसांनी फिर्याद नोंदवून घेतली.

रात्री घटनास्थळाजवळ तीन काडतूस व सहा वायसर सापडले. ते पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

<u>या घटनेच्या वेळी काही संशयास्पद प्रकार घडले आहेत</u>

१] स्वत: सिनि. फौजदार यावेळी स्वत:च्या घरी खोपोलीला [सुमारे ६ कि. मि.] धार्मिक कामासाठी गेले होते. त्यामुळे ते तेथे हजर नव्हते.

२] हल्ला होण्यापूर्वी आरोपींची जिप पोलिस ठाण्याला लागून असलेल्या रस्त्यावरून घटनास्थळमार्गे १ १/२ कि. मि. वरील वणवे गावात जावून परत आली. व हल्ला केला होता. हल्ल्यानंतरही जिप पोलिस ठाण्यावरूनच गेली. त्यावेळी सर्व पोलिस झोपले होते.

३] वणवे गावची दोन प्रमुख माणसे हल्ल्यापूर्वी व नंतर घटनास्थळाजवळ सायकल व लुनाने फिरत होती. ते दोघे धनाजी शेठचे जवळचे दोस्त आहेत.

४] हल्ला चालू असताना गावातील लाईट गेले होते.

५] हल्ला झाल्यानंतर पोलिस ठाण्यातील फोन बंद पडला व त्याची वायर तुटलेली होती.

६] धनाजी शेठ व आरोपी फरार असल्याचे पोलिस सांगताहेत, परंतु धनाजी पनवेल परिसरात त्याचे व्यवहार करीत आहे.

### हल्ल्यानंतरची आदिवासी-दलितांमधील संतापाची लाट

रातोरात जवळच्या गावातून ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. १४ ला पहाटेपर्यंत शेकडो स्त्री-पुरुष खालापूरला येत गेले, चौकशी करीत होते. धनाजी शेठ व पोलिस यांच्या विरोधी प्रचंड संतापाची लाट आल्याचे तेव्हा जाणवत होते. रागाच्या भरात कोणतेही कृत्य घडू नये म्हणून तेथे थांबलेले शांताराम, नत्थु, नारायण, यशवंत, अंबू, बळीराम, सुरेश आदि कार्यकर्ते त्यांना शांत करीत होते. प्राणघातक हल्ल्यातून आपले प्रमुख कार्यकर्ते वाचले हे पाहून तेवढेच समाधान मानून शेकडो माणसे १५ एप्रिलपर्यंत सारखी खालापूरला बसून होती. या हल्ल्याचा प्रतिकार कसा करायचा याविषयी बोलत होती.

म्हणून अगोदरच ठरल्याप्रमाणे २१ एप्रिलला मुंबई-पुणे महामार्गावरील लोधिवली येथे जाहिर सभा व रस्ता रोको कार्यक्रम निश्चित करण्यात आला. 'हिंमकिपं'च्या निर्णयानुसार रोजगाराचा हक्क व इतर मागण्यांसाठी हे आंदोलन होते.

संतप्त माणसे गावोगाव हा निरोप घेऊन परतली. २१ एप्रिलला सगळीकडून झेंडे घेऊन आदिवासी-दलित-शेतकरी-शेतमजूर स्त्री-पुरुष मोर्च्याने सभेला आले. हजारोंची जाहिर सभा व रस्ता रोको झाला. सुमारे ५५० जणांना अटक झाली. अलिबागला नेण्यात आले. त्यानंतर रात्री सर्वांना आपापल्या गावात नेऊन सोडण्यात आले.

या कार्यक्रमात विविध राजकीय पक्ष - संघटनांनी भाग घेतला होता.

दरम्यान मुंबईत भारतीय रिपब्लीकन पक्षाच्या पुढाकाराने विविध राजकीय पक्ष व संघटनांची बैठक झाली. त्यात खालापूर घटनेचा निषेध करण्यात आला. या हल्ल्याची सि. आई. डी. मार्फत स्वतंत्रपणे चौकशी करावी व इतर मागण्यांसाठी २७ एप्रिलला खालापूरला सर्वपक्षीय जाहिर निषेध सभा घेण्याचा निर्णय झाला.

याच काळात मुंबईतील जनता महिला आघाडीच्या आमदार मृणालताई गोरे, श्रमिक महिला संघाच्या कॉ. अहिल्याताई रांगणेकर, भारतीय महिला फेडरेशनच्या कॉ. मंजू गांधी, नारी अत्याचार विरोधी मंचच्या सोनल शुक्ल, नारी केंद्राच्या निर्मला साठे, समाजवादी महिला सभेच्या कमल गुजर, महिला दक्षता समितीच्या सुधा वर्दे, स्वाधारच्या शैला सातपुते व महिला कार्यकर्त्या छाया दातार, रेखा ठाकूर यांनी खालापूरमधील अत्याचारीत महिलांची बैठक घेतली. दि. २५ एप्रिलला सर्वजणी महाराष्ट्राचे गृहराज्य मंत्री नाम. जि. तु. महाजन यांना भेटल्या. या प्रकरणाची चौकशी करून धनाजी शेठला अटक करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. नंतर या स्त्रियांची वार्ताहर परिषद झाली.

पाठोपाठ २७ एप्रिल रोजी खालापूरला सर्व पक्ष संघटनांची प्रचंड जाहिर निषेध सभा झाली. तिचा लवलेशही नसलेले हजारो आदिवासी दलित शेतकरी-शेतमजूर मोर्चाने घोषणा देत सभेला आले होते. मार्क्सवादी कम्यु. पक्षाचे चिटणीस कॉ. प्रभाकर संझगिरी यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. या सभेत भाकपचे कॉ. गोपाळ शेळके, भारिप. च्या सरचिटणीस डॉ. निलम गोऱ्हे व अविनाश महातेकर, हिंमकिपं. चे सरचिटणीस शंकर साळवी

श्रमुद. चे तुकाराम कांबळे, भादपँथर. चे मधुकर कांबळे, कोळसा भट्टी कामगार संघटनेच्या निमंत्रक सुरेखा दळवी, भूमिसेने. चे रमेश चौधे, युक्रांद व कोकण लेबर युनियनचे हुसेन दलवाई, सिआरसी. चे सर्जेराव सगर, म्युनि. लेबर युनियनचे प्रभाकर आडेरकर, सर्वहारा महिला आघाडीच्या मंगल खिंवसरा, म. रा. शेतमजूर युनियनचे सरचिटणीस कॉ. कुमार शिराळकर, युक्रांद महाराष्ट्रचे कार्यवाह शांताराम पंदेरे, सुनिल पाटील, संघर्ष समितीचे नत्थु पवार आदींची भाषणे या सभेत झाली. त्यानंतर प्रचंड मोर्चा तहसिलवर नेण्यात आला. तहसिलदार व पोलिस अधिका-यांशी बोलणी करण्यात आली. त्यावेळी खालील गोष्टी अधिका-यांनी स्पष्ट केल्या.

[*] धनाजी शेठ व त्याच्या गुंडांवर इंपि. कोड कलम ३०७, १४७, १४८, १४९, ४५०, ४५२, ५०४, ५०६ व २५ आर्म्स ॲक्ट प्रमाणे खटला भरण्यात आला आहे.

[*] धनाजी शेठ व त्याच्या एका साथिदाराने अलिबागहून अटकपूर्व जामिन करून घेतला आहे.

[*] १५१ खाली धनाजीला अटक करून २५ हजार रूपयांच्या जामिनावर त्याला सोडून देण्यात आले आहे. दर रविवार व बुधवारी त्याला खालापूर पोलिस ठाण्यावर हजेरी लावण्यास सांगण्यात आले आहे.

[*] धनाजीकडे बंदूकीचा परवाना नसून वापरलेल्या बंदूका व जीप अजून सापडली नाही.

[*] अटकपूर्व जामिन रद्द व्हावा म्हणून पोलिस उच्च न्यायालयात जाणार आहेत.

## हल्ल्यानंतरची प्रतिक्रिया

धनाजी शेठ व त्याच्या साथिदारांची जी कल्पना होती की, या प्राणघातक हल्ल्यात प्रमुख कार्यकर्ते ठार होतील व आदिवासी-दलितांमध्ये दहशत बसून चळवळ खतम होईल. हे दोन्ही अंदाज पूर्णपणे चुकले. प्रमुख कार्यकर्ते जखमी अवस्थेत झोपून असतानाही हजारोंच्या संख्येने लोक रस्त्यावर उतरले आहेत. हिच विजयाची नांदी आहे.

मधु मोहितेंना सायन हॉस्पिटलमध्ये दाखल करताच विविध राजकीय पक्ष - संघटनांच्या नेते व कार्यकर्त्यांची रीघ लागली. संघर्ष समितीची चळवळ एकाकी नसून सर्वजण सोबत आहोत हा विश्वास दिला जात होता. यातील काही कार्यकर्ते व नेते पुढीलप्रमाणे :-

हिंद मजदूर किसान पंचायतचे नेते साथी जॉर्ज फर्नांडिस यांनी हॉस्पिटलमध्ये जावून मधुची चौकशी केली व जाहिर निषेध पत्रक प्रसिध्द केले. साथी शरदराव, साथी प्रभाकर मोरे, साथी नारायण फेणाणी, साथी शंकर साळवी, साथी जगदिश देशपांडे, साथी विमलताई परांजपे, माकप. चे सरचिटणीस कॉ. ए. बी. सावंत, कॉ. सत्येंद्र मोरे, कॉ. अहिल्याताई रांगणेकर, भा. रि. प. पक्षाचे नेते ॲड. बाळासाहेब आंबेडकर, सरचिटणीस डॉ. निलम गो-हे, जनता पक्षाच्या आमदार मृणालताई गोरे, अप्पा नाईक, डॉ. कुमार सप्तर्षी, लक्ष्मण जाधव, सोहनसिंह कोहली, जगन्नाथ जाधव, राष्ट्रसेवा दलाचे पन्नालाल सुराणा, ग्राम स्वराज्य समितीचे रामभाऊ देशपांडे, भारतीय दलित पँथरचे प्रा. अरूण कांबळे, टी. एम्. कांबळे, रामदास आठवले, भा. क. प. चे कॉ. सिताराम जगताप, छात्र युवा संघर्ष वाहिनीच्या रझिया पटेल, जयंत दिवाण, भिमराव म्हस्के, म. रा. शे. युनियनचे सरचिटणीस कॉ. कुमार शिराळकर, श्रमुद. चे मारूती कुमार, कॉ. भारत पाटणकर, कोकण लेबर युनियनचे हुसेन दलवाई, आर. एस. पी. च्या कॉ. पुष्पा मेहता, परिवर्तन ८४ चे प्रा. प्रविण पाटकर, राजीव कानेटकर, कोळसा भट्टी कामगार संघटनेच्या निमंत्रक ॲड. सुरेखा दळवी, शोषित जन आंदोलनचे नागेश हाटकर, आदिवासी जाणीव जागृतीचे रमाकांत पाटील, लोक समितीच्या मालती ताई चिंचलीकर व किशनभाई गोराडिया, सि. आर. सी. चे कॉ. विलास सोनावणे, लोकशाही हक्क संघटनेचे ॲन्थनी व विनोद, बी. सु. जे. चे अध्यक्ष प्रकाश देशमुख, शेतकरी संघटनेचे शरद जोशी, स. क. प. चे. सरचिटणीस कॉ. शरद पाटील, प्रा. रणजीत

[कृ. मा. प.]

परदेशी, सुगावा• चे विलास वाघ, तात्पर्य• चे संपादक सुधीर बेडेकर मा• फुले समता प्रतिष्ठानचे डॉ• बाबा आढाव, आय्• एफ्• टी• यु• च्या के• टी• इराणी, युवा जनताचे प्रभाकर देसाई, निवाराचे आनंद पटवर्धन, श्रमिक मुक्ती संघटनेचे विजय साठे, बबन घरत, लोकविज्ञान संघटनेचे गुरूनाथ पेडणेकर, निर्मितीचे अशोक सासवडकर, पत्रकार रक्षीत सोनावणे, [मिड्-डे] हिरेन बोस, लीना मयायस [फ्रीप्रेस], संजीव साबडे [म• टा• ], विवेक [डेली], नितीन वैद्य, संजीव लाटकर [मुं• सकाळ], जतीन [गुजरात समाचार], रघुवीर व गीता [इं• एक्सप्रेस], प्रतिमा जोशी [लोकप्रभा], धनंजय कर्णिक [लोकसत्ता], प्रकाश जोशी [टाईम्स ऑफ इंडिया], रमेश ओझा [समकालीन], दिनू रणदिवे [चौथी दुनिया], व विविध महिला – युवक – विद्यार्थी – कामगार संघटनांचे कार्यकर्ते, व विविध क्षेत्रातील व्यक्ती, समता आंदोलनचे संजय पंडित इ•

## नाशिक–औरंगाबाद–पुणे येथे निषेध

मुंबई पाठोपाठ नाशिक, औरंगाबाद, पुणे आदि ठिकाणी विविध राजकीय पक्ष–संघटना–कामगार संघटनांनी या हल्ल्याच्या निषेधार्थ सभा–बैठका घेतल्याचे समजले आहे•

मराठी–हिंदी–इंग्रजी व गुजराती भाषिक वृत्तपत्रांनीही या घटनेची चांगली दखल घेतली व जनतेसमोर ही घटना मांडली• या सर्वांचा परिणाम म्हणून सर्वत्र दडपशाही गुंडगिरीच्या विरोधात आज वातावरण तापताना दिसते आहे•

## पुढील कार्यक्रमाची दिशा

खालापूरसारख्या घटना महाराष्ट्रात अन्यत्रही घडताना दिसत आहेत• कष्टकरी समूहांच्या संघटीत चळवळी वाढत असल्याचे ते लक्षण आहे• मात्र दडपशाही व गुंडगिरी करणा–या शक्ती अधिक संघटीत व मजबूत आहेत• या शक्तीविरोधी लढण्यासाठी एक व्यापक स्वरूपाचे व्यासपीठ असण्याची गरज निर्माण झाली आहे•

संपूर्ण महाराष्ट्रात व देशभर या पुढच्या काळात दुष्काळी परिस्थिती भिषण स्वरूप धारण करीत आहे• यातून रोजगार–चारा–पाणी व जमिनीचे प्रश्न गंभीर बनत आहेत• औद्योगिकरण व शेतीच्या भांडवलीकरणातून निर्माण झालेले प्रश्नही उफाळून आले आहेत• यातून पर्यावरणाचा प्रश्न समोर उभा ठाकला आहे• घरांचा प्रश्न चिघळणार आहे• अशा वेळेला खालापूरला जशा या बागायतदार व कारखांनदारांनी पोसलेले गुंड चवताळून उठले तसेच याही प्रश्नांवर संघर्ष पेटणार आहे•

आपापल्या प्रश्नांवर समाजातील विविध घटक एकत्र येऊन लढा करताना दिसत आहेत• दलित–आदिवासी–भटके–विमुक्त–स्त्रिया बोलू लागल्या आहेत•

या सर्व प्रश्नांवर अलगपणे लढे न करता ज्या राजकीय–आर्थिक व सामाजिक परिस्थितीतून हे प्रश्न निर्माण झाले ती परिस्थिती बदलण्यासाठी या कष्टकरी समूहांची व्यापक एकजूट आवश्यक आहे• मक्तेबाज भांडवलदार–सधन शेतमालक–बागायतदार व दलाल–गुंडांना पाठिशी घालणा–या राजसत्तेच्या विरोधात ठिकठिकाणी लढे तिव्र करावे लागतील• अन्यथा पाशवी दंडसत्ता व गुंडांच्या सहाय्याने हे विविध घटकांचे लढे एक तर आपल्यात सामावून घेण्याचा प्रयत्न सत्ताधारी पक्ष करील किंवा अमानुषपणे दडपून टाकील यात अजिबात शंका नाही• एकेकाळी नक्षलवादी नंतर दरोडेखोर व आता दहशतवाद्यांच्या नांवाने अमर्याद अधिकार येथील पोलिस व सैन्याच्या हाती आले आहेत• यातून कष्टकरी जनतेच्या मुलभूत लोकशाही हक्कांवर गदा आली आहे•

कष्टकरी समूहांची चळवळ त्यांच्या प्रश्नांवर उभी करताना ती एकसुरी–एकांगी होण्याचा धोका संभवतो• मानवी जीवनाला व्यापणा–या विविधांगांनी ही चळवळ व्यापक करावी लागणार आहे• साहित्य–कला–संस्कृती–विज्ञान आदि क्षेत्रात कष्टकरी

••••११•

जनतेची पर्यायी लोक चळवळ उभारावी लागणार आहे. यातूनच राजकीय चळवळ अधिक सधन व परिणामकारक होणार आहे. त्यासाठी उपलब्ध साधने – नविन तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करायला हवा.

आदिवासी–दलित–भटके–विमुक्त–स्त्रिया–कामगार–शेतमजूर–कष्टकरी शेतकरी आदि समूहातील नेतृत्व व कार्यकर्त्यांची भक्कम फळी उभारावी लागणार आहे. त्यासाठी प्रशिक्षण यंत्रणा उभारून नियमितपणे साहित्य निर्मिती करावी लागणार आहे.

मागिल ७ वर्षापासून "घोषणा" नावाचे मासिक युक्रांदच्या वतीने नियमितपणे चालविण्यात येते. या प्रकाशनाचा पुरेपूर वापर या दृष्टीने करून घ्यायचा आहे.

फेब्रु. ८७ मध्ये औरंगाबाद येथे झालेल्या युक्रांदच्या १३ व्या वार्षिक शिबीरात संघटनात्मक स्वरूपाचे महत्वाचे निर्णय घेण्यात आले.

मध्यवर्ती कार्यकारिणी सोबतच घोषणा–संपादक मंडळ, प्रशिक्षण समिती, सांस्कृतिक व माध्यम समिती, निधी समिती निर्माण करण्यात आल्या आहेत. युक्रांदच्या प्रत्येक केंद्रात या स्वरूपाची रचना निर्माण करून चळवळीची व्याप्ती वाढविण्याचा प्रयत्न होत आहे.

औरंगाबाद, जालना, पुणे, रायगड, व नागपूर येथे युक्रांद व जन आघाडयां मार्फत चळवळ उभी राहिली आहे. त्यासाठी आदिवासी–दलित–भटके–विमुक्त–स्त्रिया आदि कष्टकरी समूहातील स्थानिक कार्यकर्ते मोठया संख्येने जवळजवळ पूर्णवेळ देत आहेत.

यासर्व ताकदीनिशी पुढील काळात खालील प्रश्नांवर लढे व कार्यक्रम घ्यायचे आहेत.

- दुष्काळ निर्मूलनाचा लढा: रोजगार–चारा–पाणी प्रश्नांवर लढा करीत असताना दुष्काळ मुलगामी धोरण आखण्याचा प्रयत्न चालू आहे.
- गायरान–जंगल–दली जमिनी नांवावर करण्याचा लढा चालू आहे. यातून जंगल–जमिन व पाणी विषयक लोकाधारित भूमिका विकसित केली जात आहे.
- रोहा येथील प्रदूषण पहाणीचे निष्कर्षावर आधारित धोरण व कार्यक्रम आखला जात आहे.
- मराठवाडयातील दुष्काळ व खा–या जमिनीचा प्रश्न समजून घेऊन त्यासाठी ठोस उपाय योजण्याचा भाग म्हणून औरंगाबाद जिल्हयात "पाणी पहाणी" करण्याचा निर्णय झाला आहे.
- १३ एप्रिलच्या बालापूर बैठकीत गावठाण–गुरचरण–जंगल दळी जमिन, रोजगार, पाणी प्रश्न पोलिस व गुंडांचे अत्याचार याविषयी महत्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यांची अंमलबजावणी करण्याचे काम संघर्ष समितीला पुढील काळात करावे लागणार आहे. तर खेड [जि. पुणे] येथे लोकसमितीने पुढाकार घेतला आहे.
- कार्यकर्ते प्रशिक्षण व साहित्य निर्मीती यंत्रणा उभारायची आहे.
- स्लाईड शोज – चित्रप्रदर्शन – कलापथक आदि माध्यमांची गरज निर्माण झाली आहे.

## आवाहन

या सर्व पार्श्वभूमिवर आज युक्रांद व जनआघाडया कार्यरत आहेत. सतत संघर्षाचे जीवन जगताना चळवळीला लागणारी अन्य साधनसामुग्री उभारायला लागणारी उसंत मिळेनाशी होत आहे. प्रत्यक्ष सक्रिय कार्यकर्तेच हे सर्व ओढून नेतील असे वाटत नाही. किंबहूना अर्धवेळ कार्यकर्ते व विविध क्षेत्रात आपापला व्यवसाय करणारे आपल्या सारखे हितचिंतक–सहकारी यांची महत्वाची भूमिका या पुढील काळात आहे.

चळवळीसमोरची आव्हाने व अडचणीतून मार्ग काढण्याविषयी आपणाकडून योग्य मार्गदर्शनाची अपेक्षा आहे. चळवळ व्यापक व विविधांगांनी विकसित करीत असताना

[कृ. मा. प.]

आपण निश्चित स्वरूपाची जबाबदारीही स्विकारु शकता. किंबहूना या स्वरूपाचा सामुदायिक प्रयत्नातूनच उद्देश सफल होणार आहे. कार्याचा अनुभव-ज्ञान-कसब व्यक्तीपुरते मर्यादित न रहाता कष्टकरी समूहांशी तादात्म्य पावून ते या चळवळींचा भाग बनले पाहिजे. यातूनच समोरची मोठी आव्हाने आपण पेलू शकू असा आत्मविश्वास वाटतो आहे.

महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रात पूर्णवेळ काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण व मानधन कायमची व्यवस्था करण्याची गरज आहे. या कार्यकर्त्यांचा आरोग्याचा प्रश्न वारंवार उभा रहात असतो. खालापूर सारखे अनेक खटले कोर्टात चालू आहेत. याचा खर्चही मोठा आहे. हितचिंतक-नोकरी करणारे कार्यकर्ते-कष्टकरी समूहातून निधी उभारण्याचे काम युक्रांद करीत आले आहे. या कामातही आपला सक्रिय पुढाकार आहे. नियमितपणे आर्थिक सहकार्य अपेक्षित आहे.

आपण ही सर्व परिस्थिती समजून घेऊन या आपल्या चळवळीत सहभाग घ्याल ही आशा बाळगून आहोत. कष्टकरी समूहांचा वाढता पाठिंबा व आपले सहकार्य या गोष्टीतूनच आमचा आशावाद उंचावतो आहे. वेळोवेळी भेटत राहू.

आपले,

| | | |
|---|---|---|
| शांताराम पंदेरे<br>[कार्यवाह] | मधु मोहिते<br>[सहकार्यवाह] | वसुधा सरदार |
| निर्मला स्वामी | गंगाधर त्रिभुवन | अजित सरदार |

मध्यवर्ती कार्यकारिणी, युक्रांदे, महाराष्ट्र

संपर्कासाठी काही पत्ते :

१] माधुरी समेळा :- पोतदार बिल्डिंग, शास्त्रीनगर, कळवा, ठाणे-४०० ६०५.
२] रेखा ठाकूर :- जे-१७, पाम एकर्स सोसा. सी.डी. देशमुख उद्यानाजवळ, मुलूंड [पूर्व], मुंबई-४०० ०८१, फोन : ५६१ २९ ६०.
३] ॲड. राजीव पाटील :- ३६, कृष्णकुंज, डॉ. म. ब. राऊत मार्ग, शिवाजी पार्क, मुंबई - ४०० ०२८., फोन : ४५ ८४ ८९.
४] शैला सातपुते :- डी. २६७, रिझर्व्ह बँक क्वार्टर्स, मराठा मंदिरमागे, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८., फोन : ८९ ४४ ९२
५] संध्या नाईक :- नंदादीप नगर, गोरेगांव [पूर्व], मुंबई-४०० ०६३.
६] मंगल खिंवसरा :- चव्हाण निवास, दै. अजिंठा प्रेसजवळ, खोकडपुरा, औरंगाबाद-४३१ ००१.
७] वसुधा सरदार :- १२४३/२, आपटे रोड, डेक्कन जिमखाना, पुणे-४११ ००४. फोन : ५८८०९.
८] अनिल मेश्राम :- लष्करी बाग, कमाल चौक, नागपूर.
९] नत्थु पवार :- संघर्ष समिती, मु. वणवे [कातकरी वाडी], पो. ता. खालापूर, जि. रायगड.

प्रकाशक : घोषणा प्रकाशन : मध्यवर्ती कार्यकारिणी, युक्रांदे, महाराष्ट्रकरिता, पुणे-४११००४.

देणगी मूल्य - दोन रुपये फक्त